# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---

प्रेसनोट

## पीएमपीएमएल कडून कोंढणपूर येथील श्री तुकाईदेवी यात्रेनिमित्त दररोजच्या नियमित ५ बसेससह २ जादा बसेसचे नियोजन

➢ <u>जादा बसेस आठवड्यातील दर रविवार, मंगळवार व शुक्रवार या दिवशी भाविकांच्या सोयीसाठी धावणार</u>

पीएमपीएमएल कडून कोंढणपूर येथील श्री तुकाईदेवी यात्रा निमित्ताने भाविकांच्या सोयीसाठी मार्ग क्र. २९२- कात्रज सर्पोद्यान बसस्थानक ते कोंढणपूर या मार्गावर दि. २९/१२/२०२३ ते दि. २९/०२/२०२४ या कालावधीत आठवड्यातील दर रविवार, मंगळवार व शुक्रवार या दिवशी २ जादा बसेस सोडण्यात येणार आहेत.

सध्या कात्रज सर्पोद्यान बसस्थानक ते कोंढणपूर या मार्गावर पीएमपीएमएलच्या दररोज नियमित ५ बसेस दर ३० मिनिटांच्या वारंवारीतेने सुरु असून दिवसभरात एकूण ५८ फेऱ्या होतात. या ५ बसेस व्यतिरिक्त २ जादा बसेसचे नियोजन दि. २९/१२/२०२३ ते दि. २९/०२/२०२४ या कालावधीत आठवड्यातील दर रविवार, मंगळवार व शुक्रवार या दिवशी करण्यात आले आहे. सदरच्या २ जादा बसेस भाविकांच्या गर्दीनुसार व आवश्यकतेनुसार धावतील.

तसेच पुणे सातारा रोडवर कात्रज सर्पोद्यान बसस्थानकावरून बसमार्ग क्र. ६१- कात्रज सर्पोद्यान ते सारोळा (दररोज ५ बसेस), मार्ग क्र. २९३- कात्रज सर्पोद्यान ते सासवड - मार्गे कापूरहोळ (दररोज २ बसेस), मार्ग क्र. २९६- कात्रज सर्पोद्यान ते विंझर (दररोज ३ बसेस) व मार्ग क्र. २९६अ- कात्रज सर्पोद्यान ते वांगणीवाडी (दररोज १ बस) या मार्गावर संचलनात असणाऱ्या बसेस कोंढणपूर फाट्यापर्यंत जाणेसाठी उपलब्ध आहेत.

तरी कोंढणपूर येथील श्री तुकाईदेवी दर्शनासाठी जाणाऱ्या सर्व भाविकांनी सदर बससेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पीएमपीएमएल कडून करण्यात येत आहे.

**sd/-**

चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन)

**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

---

दि. २७/१२/२०२३

मा. संपादक,

दैनिक ..........

यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.

मा. स. कळावे.

**sd/-**

कामगार व जनता संपर्क अधिकारी

पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.